# आरोग्य विभाग
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** – dho_gad@rediffmail.com


**आरोग्य सेवा**

क्र. जिपग/आरोग्य/सीएसआर/४२८/२०२६
कार्यालय जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली
दिनांक : २१ / ०१ /२०२६.

## उमेदवारांकरीता सुचना

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे स्तरावर आरईसी फाऊंडेशन मार्फत सीएसआर निधीतून भामरागड व एटापल्ली तालुक्यात प्रत्येकी १ याप्रमाणे २ मलेरिया मोबाईल युनिट कार्यान्वीत करण्यासाठी ३ महिन्यासाठी रोजंदारी पद्धतीने पदे भरण्यासाठी भरतीप्रक्रिया सुरु असून अर्हताधारक इच्छूक उमेदवारांकडून दिनांक २०/०१/२०२६ रोजी रात्रौ ११.५० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. अर्ज सादर करतांना उमेदवारांना भरती शुल्क **रुपये १००/-** इतकी रक्कम जाहिरातीमध्ये दिलेल्या बॅंक खात्यावर ऑनलाईन (इंटरनेट बॅंकींग, फोन पे, गुगल पे ईत्यादी) अथवा जाहिरातीमध्ये दिलेल्या बॅंक खात्यावर ऑफलाईन स्वरुपात रोखीने जमा करण्याबाबत कळविलेले होते. परंतू बऱ्याच उमेदवारांनी फोन पे व गुगल पे द्वारे भरती शुल्क भरतांना अडचण आल्याबाबत दुरध्वनी व ईमेलद्वारे या कार्यालयास कळविलेले असल्यामुळे उमेदवारांना संधी प्रदान करण्याच्या उद्देशाने अर्ज भरण्याकरिता **दिनांक २२/०१/२०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

यानंतर अर्ज सादर करण्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने उमेदवारांनी विहित पद्धतीचा अवलंब करुन भरती शुल्क व अर्ज विहित मुदतीत सादर करावेत. याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

सदस्य सचिव (निवड समिती) तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली